प्रकरण - चौथे

# ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय आणि लवचिकता

# प्रकरण - चौथे

# 'ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय आणि लवचिकता'

**प्रस्तावना :-**

ग्रामीण कवितेत अभंगाचा घाट स्वीकारणे हा काही अभिनव प्रयोग नाही. या अगोदर म.फुले, केशवसुत, गोविंदाग्रज, बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, मधुकर केचे यांनी आपल्या कवितेत अभंगाचा घाट स्वीकारलेला आहे. ग्रामीण कवितेमध्ये अभंगाचा घाट विशेषत: १९८० नंतरच्या श्रीकांत देशमुख, भगवान ठग, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, सोपान हाळमकर, प्रकाश होळकर, राजन गवस इ. कवींनी आपल्या कवितेमध्ये स्वीकारून कविता अधिक प्रगल्भ व प्रभावी केली. प्राचीन काळी निर्माण झालेला अभंग हा ग्रामीण भागातील सामान्य जनाच्या उद्धारासाठीच अविष्कृत झाला आणि १९८० नंतर कवितेत आलेला अभंग हाही ग्रामीण जीवन मांडण्यासाठीच निर्माण झाला आहे. ही सुखद घटना आहे.

अभंगातील आशय काळानुरूप कसा बदलत जातो याचे उदाहरण म्हणजे 'बळिवंत' व 'अन्नदात्याची धुळाक्षरे' ह्या कलाकृतीकडे पाहता येईल. याशिवाय या प्रकरणात अभंगाच्या अंगी असलेल्या 'लवचिकता' ह्या गुणाचा कोणत्याही कालखंडात आपणाला सहज वापर करता येतो. हे वरील दोन काव्यसंग्रहांच्या अनुषंगाने स्पष्टपणे मांडून निष्कर्ष नोंदविण्याचा याठिकाणी प्रयत्न केला जाणार आहे. प्रस्तुत प्रकरणाची मांडणी खालीलप्रमाणे केली आहे.

१. आकृतिबंध संकल्पना

२. अभंग आकृतिबंध संकल्पना

३. ग्रामीण कवितेतील अभंग आकृतिबंधाची परंपरा

४. ग्रामीण कवितेतील अभंग आकृतिबंधात 'संतसाहित्य' केंद्रस्थानी

५. ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय

५.१ शेतकरी जीवन

५.२ कृषिव्यवस्था

५.३ सामाजिक जीवन

५.४ सांस्कृतिक जीवन

५.५ शेतकऱ्यांच्या दुस्थितीला जबाबदार घटक

६. ग्रामीण कविता : अभंगातील लवचिकता

६.१ शब्द योजनेच्या दृष्टीने आलेली लवचिकता

६.२ चरण योजनेच्या दृष्टीने आलेली लवचिकता

६.३ स्थळकाळाच्या दृष्टीने आलेली लवचिकता

६.४ आशय योजनेच्या दृष्टीने आलेली लवचिकता

७. निष्कर्ष

## १. आकृतिबंध संकल्पना :-

मराठी साहित्यात 'आकृतिबंध' ही संकल्पना तेराव्या शतकापासून अस्तित्वात आहे. 'आकृतिबंध' ह्या शब्दाला अनेक अर्थाने संबोधले जाते. इंग्रजीतील ' Form' (फॉर्म) या शब्दावरून 'आकृतिबंध', 'घाट' हा शब्द आपल्या साहित्यात रूढ झाला आहे. मराठी साहित्यात आकृतिबंधालाच 'घाट', 'आकार', 'सौष्ठव', 'रूपबंध', 'बांधणी', 'अभिव्यक्ती'; 'कलाकृतीचे अंतिम रूप' इ. नावाने संबोधिले जाते. आकृतिबंधाविषयी मधु कुलकर्णी म्हणतात - ''आशयाची अभिव्यक्ती होत असताना कलाकृतीमध्ये आशयाला जे अंतिम रूप लाभते, जो आकार लाभतो त्यालाच आकृतिबंध म्हणतात.''[१] 'आकृतिबंध' या घटकांमध्ये प्रामुख्याने 'आशय', 'अभिव्यक्ती' आणि 'आविष्कार' या तीन गोष्टी मुख्य आहेत. कारण आशयशिवाय आविष्कार होत नाही अन् आविष्काराशिवाय अभिव्यक्ती होत नाही तर अभिव्यक्तीशिवाय कलाकृतीला अंतिम घाट प्राप्त होत नाही. म्हणजे आशय आणि अभिव्यक्ती यांची पेरणी केली की जे उगवून येते त्यास आकृतिबंध म्हणावे.

कलाकृतीला अंतिम घाट कसा प्राप्त होतो ? तर कोणताही कलावंत जीवनाची अनुभूती इंद्रियाद्वारे घेतो. आणि या अनुभवाचे प्रकटीकरण तो कधी प्रतिमा, प्रतीके तर कधी अलंकार, वृत्ते या घटकांच्या माध्यमातून करत जातो. आपण घेतलेला अनुभव व्यक्त व्हावा ही कलावंताची सुप्त इच्छा असते. त्यासाठी तो सतत धडपडत असतो. कारण त्याला एका बाजूला आनंद तर दुसऱ्या बाजूला ज्ञान मिळत असते.

कलावंत आपल्या मनातील आशय जेव्हा व्यक्त करतो त्यावेळी अनुभवाच्या अनेक छटा, अनेक पैलू व्यक्त होत जातात. तिथेच खऱ्या अर्थाने कलाकृतीचा अंतिम घाट, आकृतिबंध तयार होत

असतो. मधु कुलकर्णी म्हणतात - ''अनुभवांमध्ये जितकी विविधता, जितकी व्यामिश्रता, जितकी गुंतागुंत, तितकी त्यामध्ये तरलता, सूक्ष्मता तयार होते, कलाकृतीचा अंतिम घाट तयार होण्यास मदत होते. कलाकृतीचा अंतिम घाट तयार होण्यासाठी आशयाचे गुणधर्म भरभक्कम असावे लागतात. कलावंताच्या व्यक्तीमत्वावर आशयाचा संस्कार झालेला असावा लागतो. आशय वस्तुनिष्ठ असावा लागतो. कलावंताचे व्यक्तीमत्व हे व्यक्तीनिष्ठ असावे लागते. तरच श्रेष्ठ कलाकृती आणि श्रेष्ठ आकृतिबंध निर्माण होतो.''[२] आकृतिबंधाच्या निर्मितीमध्ये कलावंताचा अनुभव, आशय, अभिव्यक्ती, आविष्कार, अक्षरांची, शब्दांची, वाक्यांची योजना आणि क्रम यांना निश्चित करावे लागते.

## २. अभंग आकृतिबंध संकल्पना :-

संत साहित्यातील 'अभंग' हा गेली सातशे वर्ष मराठी मनावर अधिराज्य गाजवित आहे. तो ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही समाजाच्या आवडीचा आणि परिचयाचा आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'ओवी' छंद मराठीत अमर करून ठेवला. त्याचप्रमाणे 'अभंग' हा इतर महाराष्ट्रीयन संतांनी अमर करून ठेवला. 'अभंग' छंदाचे मूळ शोधण्याचा अनेक विद्वानांनी प्रयत्न केला आहे. ना. ग. जोशी म्हणतात- ''अपभ्रंशकालीन लोकगीत सदृश्य कवनातून 'ओवी', 'अभंग'विकास पावले आहेत.''[३] तर ह. द. वेलणकर यांच्या मते - ''अपभ्रंश भाषेतील षट्पदीपासून 'अभंग' आणि 'ओवी' हे छंद मराठीत आले. त्यांच्या मते, षट्पदीचे अर्ध हा ओवीचा मूळाधार म्हणून ओवी साडेतीन चरणी हेच वैशिष्ट्य अभंगात राहिले आहे.''[४]

ओवी आणि अभंग हे दोन्हीही छंद एकमेकांत पुरते मिसळले आहेत. मात्र स्वर आणि तालांचा निकष लावला, की अभंग आणि ओवी एकमेकांपासून विभक्त होतात. काळाच्या ओघात दोन्हीही छंद प्रकारांनी आपले वेगळेपण व विकास सिद्ध करून दाखविला आहे. 'अभंग' हा छंद अंतरीच्या वेदनेला वाट मोकळी करून देतो. भोळ्या भाबड्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देतो. मानवी मूल्यांची जाणीव आणि जोपासना करण्याचे काम अभंग करतो. म्हणूनच तो जनसामान्यांना आपला वाटतो. जवळचा वाटतो. संतसाहित्यात अभंगाचे दोन प्रकार मानले जातात. ''ना. ग. जोशी यासच लहान व मोठा अभंग मानून 'देवद्वार' व 'देवीवर' असे त्याचे नामकरण करतात.''[५] लहान अभंग 'देवद्वार' जातीचा तर मोठा अभंग 'देवीवर' जातीचा म्हणून ओळखला जातो. अभंगामध्ये किती चरणसंख्या असावी याबाबत कोणताही नियम नव्हता. मात्र काळाच्या ओघात 'अभंगाचा' अनेक विद्वानांनी चिकित्सक अभ्यास करून त्याची चरणसंख्या निश्चित केली आहे.

मो. रा. वाळंबे यांच्या मते - ''मोठ्या अभंगात चार चरण असून पहिल्या तीन चरणांत सहा अक्षरे व चौथ्या चरणात चार अक्षरे असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत यमक असते.''

**लक्ष्मण भावोजी । मागे पुढे स्वामी । मज आहे धामी । ऐसे वाटी ।** (६।६।६।४)

केव्हा केव्हा मोठ्या अभंगाच्या चार चरणांतील पहिल्या तीन चरणांत यमक असते.

**जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।।** (६।६।६।४)

पृ.१६६

''लहान अभंगाला दोन चरण असतात व प्रत्येक चरणात सामान्यत: आठ अक्षरे असतात. क्वचित पहिल्या चरणांत सहा किंवा सात अक्षरे असतात. दुसऱ्या चरणांत केव्हा केव्हा नऊ किंवा दहा अक्षरे असतात.''[६]

**अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।**

**तुका म्हणे नाव । जनकासाठी उदकी ठाव ।** (६।९।६।९) पृ.१६६

## ३. ग्रामीण कवितेतील अभंग आकृतिबंधाची परंपरा :-

मराठी कवितेतील अभंग आकृतिबंधाची परंपरा फार प्राचीन आहे. कविता करणे ही कसरत नसून तो कवीच्या व्यक्तीमत्वाचा स्वयंभू आविष्कार असतो.आपल्या अनुभूतीचा आविष्कार करताना अनेक कवींनी वेगवेगळ्या छंदाला जवळ केले. ग्रामिण जीवनानुभवाच्या प्रकटीकरणासाठी अनेक कवींना अभंग आकृतिबंध जवळचा वाटला आणि त्यांनी त्याचा स्वीकारही केला.

मराठी कवितेत अभंग आकृतिबंधाचा स्वीकार कवी म. फुले, केशवसुत, गोविंदाग्रज, बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, यांनी केला. हीच परंपरा १९६० नंतरही अविरतपणे पुढे चालविण्याचे काम बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, आनंद यादव, गुरूनाथ धुरी, मधुकर केचे, तुळसी परब, विलास सारंग, इंद्रजित भालेराव, विठ्ठल वाघ, राजन गवस, भगवान ठग, श्रीकांत देशमुख, प्रकाश होळकर, सोपान हाळमकर इ. कवींनी केले आहे. ग्रामीण कवितेतील अभंगाला अशी समृद्ध व संपन्न परंपरा आहे.

## ४. ग्रामीण कवितेतील 'अभंग' आकृतिबंधात 'संतसाहित्य' केंद्रस्थानी :-

ग्रामीण कवितेतून ग्रामीण जीवन आणि कृषिसंस्कृती यांना अभिव्यक्त करताना अनेक कवींनी संतसाहित्याचा आधार घेतला आहे. बळीराजाचा जीवनानुभव, त्याचे कष्ट, दु:ख, वेदना, आशा,

आकांक्षा, इच्छा प्रकट करताना अनेक कवींनी संतसाहित्याचा प्रतिमा-प्रतीकांसाठी वापर केला आहे. कारण 'संतसाहित्य' हा उभ्या महाराष्ट्राच्या जिव्हाळ्याचा आणि परिचयाचा प्रांत आहे. ग्रामीण कृषिजनसमुहावर संतसाहित्याचा खूप पगडा आहे. म्हणूनच कदाचित ग्रामीण कवितेत अभंग आकृतिबंध स्वीकारला असावा.

'अभंग' आकृतिबंधातून व्यक्त केलेला जीवनानुभव प्रभावी आणि परिणामकारक ठरतो याची प्रचिती आपल्याला बहिणाबाई चौधरी, ना. धो. महानोर, विंदा करंदीकर, बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेतून येतेच. हाच धागा पकडून कवी इंद्रजित भालेराव, विठ्ठल वाघ, राजन गवस, श्रीकांत देशमुख, भगवान ठग यांनी आपल्या कवितेत अभंगाचा स्वीकार केला आहे. संतसाहित्यातील अभंगात असलेली विशिष्ट लय, नाद, ठेका, ताल ही सर्व वैशिष्टये आजच्या ग्रामीण कवितेतील अभंग आकृतिबंधात दिसतात. म्हणूनच ग्रामीण कवितेतील 'अभंग' यशस्वी वाटचाल करताना दिसतो.

## ५. ग्रामीण कविता : अभंगातील बदलता आशय :-

१९८० नंतरच्या पिढीमध्ये प्रामुख्याने श्रीकांत देशमुख, भगवान ठग, प्रकाश होळकर, सोपान हाळमकर, इंद्रजित भालेराव, राजन गवस, विठ्ठल वाघ, यांनी अभंगाचा वापर ग्रामीण कवितेमध्ये फार प्रभावीपणे केला आहे. १९८० पूर्वीही केशवसुत, गोविंदाग्रज, बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर, मधुकर केचे इ. नी अभंग लिहिले आहेत. परंतु त्यांच्या कवितेमध्ये ग्रामीण जीवन फार कमी प्रमाणात व्यक्त झाले आहे. शिवाय 'अभंग' कलारूपाची खास परंपरा निर्माण होईल अशी कोणी दक्षता घेतलेली नाही. केवळ वेगळेपण म्हणून त्याकडे पाहता येईल. मात्र १९ व्या शतकात म.फुले यांनी 'अखंड' हे कलारूप ज्या ताकदीने अभंगाला जवळीकता साधेल असे अविष्कृत केले. त्यानंतर १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतच अभंग प्रभावीपणे व्यक्त झालेला दिसून येतो.

अभंगातील आशय काळानुरूप कसा बदलत जातो. याचे उदाहरण म्हणजे 'बळिवंत' (श्रीकांत देशमुख) व 'अन्नदात्याची धुळाक्षरे' (भगवान ठग) ह्या कलाकृतीकडे पाहता येईल.

### ५.१ शेतकरी जीवन :-

कवी भगवान ठग व कवी श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेतून शेतकरी जीवनाचा वेध घेताना काळानुरूप अभंगातील आशय कसा बदलत जातो. याचे दर्शन घडविले आहे. शेतकऱ्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती, त्यांच्या आशा, आकांक्षा, सुख, दु:ख, वेदना अशा अनेक गोष्टी दोन्ही कवींनी अभंगातून अविष्कृत केल्या आहेत.

कवी श्रीकांत देशमुख 'बळिवंत' मधून बळिराजाच्या वैयक्तिक दु:खाबरोबरच त्यांच्या गोतावळ्याच्या दु:खालाही अधोरेखीत करतात. बळिराजाचे दु:ख, बळिराजाला, त्याच्या गोतावळ्यालाही मरणवेदना देणारे आहे. हे 'पावलांचा माथा' ह्या कवितेतून त्यांनी अतिशय सूक्ष्मपणे मांडले आहे.

**जोडीला ठिगळ**

**झाकोनिया मांडी**

**वखराची दांडी** **हाती घ्यावी** (६।६।६।४ - पृ. ७२)

ग्रामीण जीवनातील बळिराजाचे वास्तव जीवन या अगोदरच्या कवितेतून फारसे दिसून येत नाही.

'गावाची पंढरी' ह्या कवितेतून देशमुखांनी महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित नष्ट होत चालल्याची जाणीव करून दिली आहे. पंढरीची एकही वारी न चुकविणारा बळिराजा आज पंढरीला जात नाही. कारण बळिराजाच्या आजूबाजूला असणारे आजचे वास्तव सांस्कृतिक संचितालाच बेचिराख करून टाकणारे आहे. म्हणून गावालाच पंढरी करण्याची कवीची कल्पना बळिराजाच्या जगण्याचे बळ ठरते.

**माझिया गावाची**

**करावी पंढरी**

**तसे वारकरी** **मेळवावे** (६।६।६।४ - पृ. ५५)

कवीने व्यक्त केलेला आशय बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतो. 'विहीर' ह्या कवितेतून बळिराजाला प्रत्येक हंगामाची जाणीव करून देणारे मराठी महिने आज लोप पावण्याच्या मार्गावर आहेत.

**आषाढ श्रावण**

**कधी एक झाले**

**गाव उभे न्हाले** **पावसाने** (६।६।६।४ - पृ. ७४)

ग्रामीण जीवनातून जुन्या चालीरिती, रूढी आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. म्हणूनच कवी आपल्या कवितेतून जुन्या चालीरितींना नवसंजीवनी देतो. कवी देशमुखांनी अभंग आकृतिबंधातून ग्रामीण जीवनाचा घेतलेला सूक्ष्म शोध वाचकांना, अभ्यासकांना, वेगवेगळ्या दिशांनी विचारप्रवृत्त करतो.

बळिराजाच्या दु:खाला जशी नियती, निसर्ग कारणीभूत आहे. तितकीच या देशातील व्यवस्था कारणीभूत आहे. शेतकऱ्याचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेचा कवी आपल्या कवितेतून खरपूस समाचार घेतो.

**गढीतल्या भूता**

**द्यावा गळफास**

**कोंडलेला श्वास दारोदार** (६।६।६।४ - पृ.७७)

कवी शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या व्यवस्थेला 'गढीचे भूत' संबोधतो. अशा भूताचे समूळ उच्चाटन करण्यासाठी त्याला फासावर लटकाविण्याची भाषा करतो. कवी देशमुख बळिराजाच्या दु:खाचे मूळ अशा अभंगातून शोधतात. आणि त्यावर उपायही सुचवितात. ग्रामीण कवितेत अभंगातून व्यक्त झालेला आशय नाविन्यपूर्ण आहे. शिवाय त्यात विविधताही दिसून येते. कवी अभंगरूपी कवितेतून बळिराजाचे दु:ख, बळिराजाच्या श्रद्धा, निष्ठा, चालीरिती तर कधी त्याच्या दु:खाचे वाटेकरी शोधतात. हा अभंगातील बदलता आशय प्रत्येक टप्प्यांवर वेगळी वळणे घेताना दिसतो. कवी देशमुखांनी आपल्या अभंगरूपी कवितेतून शेतकरी जीवनाचा वेध घेताना संत साहित्यातील मोठ्या अभंगाचे अनुकरण केले आहे.

कवी भगवान ठग शेतकऱ्यांचे वास्तव जीवन अभंगातून रेखांकित करतात. बळिराजा हा स्वत: उपाशी राहून मातीत घाम गाळतो आणि जगाची भूक भागवितो. जगाची भूक भागविणारा हा पोशिंदा जगाची काळजी करतो. पण त्या बळिराजाची काळजी इथली व्यवस्था करत नाही की त्याच्या घामाचे मोल त्याला देत नाही. उलट त्याच्याच घामाचा बळी इथली व्यवस्था घेते.

**आहेस पोशिंदा**

**तू या जगताचा**

**तुझ्याच घामाचा**

**बळी गेला** (६।६।६।४ पृ. १०)

कवी भगवान ठगांची 'चेहरा' ही कविता. बळिराजाचे वैभव मातीत दडल्याचे सांगते. बळिराजाला कुणाच्या पाठीमागे जाण्याची, कुणापुढे हात पसरण्याची, कुणापुढे भीक मागण्याची गरज नाही. कारण मातीच्या कुशीतच त्याचे वैभव दडलेले आहे. फक्त त्याकडे बळिराजाने नीटपणे पाहण्याची गरज आहे.

**कुशीमध्ये माती**

**मातीत वैभव**

**तरीही आर्जव**

**कशासाठी** (६।६।६।४ - पृ. ०९)

बळिराजाने कुणापुढे अर्ज, विनंती, आर्जव करू नये अशी कवीची शिकवण आहे. कवीने बळिराजाच्या वास्तव जीवनाचा घेतलेला वेध आणि अभंगातून त्याला दिलेला बोध हा ग्रामीण कवितेतील बदलत्या आशयाची वळणे सूचित करतो. कवी ठगांनीही शेतकऱ्यांच्या जीवनाचे दर्शन घडविताना मोठ्या अभंगाचे अनुकरण केले आहे.

## ५.२ कृषिव्यवस्था :-

भारतीय जीवनामध्ये कृषिव्यवस्थेला अनन्यसाधारण असे स्थान आहे. कृषिव्यवस्थेमध्ये शेती, शेतकरी, कष्टकरी, बारा बलुतेदार, निसर्ग, पाऊस, वारा, दुष्काळ, प्राणी, पशू, पक्षी असे असंख्य घटक समाविष्ट होतात. कवी ठग व कवी देशमुख यांनी आपल्या अभंगरूपी कवितेतून समग्र कृषिव्यवस्थेचा आविष्कार घडविला आहे. हा आविष्कार घडविताना त्यांच्या कवितेतील आशय वेगवेगळ्या टप्प्यांवर बदलताना दिसतो.

कवी ठग यांच्या 'शेती' ह्या कवितेमध्ये बळिराजा शेतात आयुष्यभर राबतो. त्यांच्या राबण्याला ना अंत ना शेवट असतो. त्याचे राबणे अखंड सुरू असते. शेत, गुरंढोरं, नांगरणी, पेरणी, कापणी, मळणी अशी असंख्य कामे तो रोज करीत असतो. या कामातून त्याला जेवणासाठीसुद्धा वेळ नसते. इतके कष्ट त्याच्यासमोर पडलेले असतात.

**झाली रानभर**
**आयुष्याची ओवी**
**आभाळाला यावी**
**कृष्णकळा** (६।६।६।४ - पृ. ०९)

बळिराजाचे कष्ट रानभर पसरलेल्या ओवीसारखे आहे. असे वर्णन करून कवी ठग बळिराजाच्या कष्टाचे स्वरूप विशद करतात.

कवी ठगांच्या 'चौकटीच्या आत' ह्या कवितेमध्ये बळिराजाचे संपूर्ण लक्ष मातीतून तरारून येणाऱ्या कोंबाकडे केंद्रीत झाले आहे. कारण मातीतून कोंब तरारून वर आले तरच बळिराजाच्या कष्टाला मूल्य प्राप्त होते. अन्यथा त्याचे कष्ट निरर्थक ठरते. कवी ठग आपल्या अभंगरूपी कवितेतून बळिराजाच्या जगण्याच्या प्रेरणा शोधतात.

**केव्हा हे येतील**

**मातीच्या आतून**

**देतील साधून**

**देहमूल्य** (६।६।६।४ - पृ. ३९)

ग्रामीण कवितेतील हा बदलता आशय कृषिव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून व्यक्त झाला आहे.

कवी ठगांच्या 'दु:खाचा विवाद' ह्या कवितेमध्ये कृषिव्यवस्थेचा घटक असलेला बळिराजा रात्रंदिवस त्या वावरात कष्ट करीत असतो. परंतु त्याच्या कष्टाला सुख कधीही बिलगून येत नाही. ज्याप्रमाणे अंधारात चमकणारा काजवा संपूर्ण अंधार नष्ट करत नाही. त्याप्रमाणे रात्रंदिवस शिवारात राबणाऱ्या बळिराजाचे दु:ख तो करत असलेले कष्ट नष्ट करत नाही. म्हणूनच तो देहत्याग करतो.

**एकटा काजवा**

**रात्रंदिन फिरे**

**वावरात करे**

**देहत्याग** (६।६।६।४ - पृ.५८)

बळिराजाचे शिवारातील कष्ट त्याचे जीवन निरर्थक आणि अर्थशून्य बनविते. कवी ठगांनी बळिराजाच्या जीवनाचा घेतलेला हा सखोल वेध ग्रामीण कवितेतील वेगळेपण दर्शविते. कवी ठगांच्या कवितेतील बळिराजाआपल्या अविरत श्रमणाऱ्या देहाला मूल्य प्राप्त व्हावे म्हणून मातीतून उगवून येणाऱ्या कोंबाची जीव लावून वाट पाहतो. तर कधी हाच बळिराजा मातीतले आपले कष्ट, आपले दु:ख, दारिद्र्य नष्ट करत नाही म्हणून देहत्यागही करतो. म्हणजे ठगांच्या अभंगरूपी कवितेतील आशय वेगवेगळ्या टप्प्यांवर कसा बदलतो. याचा पुरावा त्यांची कविताच देते.

कवी श्रीकांत देशमुखांनी आपल्या अभंगरूपी कवितेतून कृषिव्यवस्थेचे चित्रण करताना 'वास्तवतेला केंद्रस्थानी' ठेवले आहे. 'आला पाऊस शिवेत' ह्या कवितेतून कृषिव्यवस्थेचा घटक असलेल्या मायचे खरंखुरं जगणं प्रकट केले आहे. दांडाचं लुगडं नेसणारी कवतिकी माय आपल्या आयुष्यात अनेक उन्हाळे पावसाळे अनुभवते उभं आयुष्य झडलं तरी तिच्या जीवनातील उन्हाळा संपत नाही. हे तिच्या अंगावर असणाऱ्या दांडाच्या लुगड्यावरून प्रतीत होते. अनेक उन्हाळे पावसाळे अनुभवणाऱ्या कवतिकी मायला गावशिवेत आलेला पाऊस नवा असला तरी त्यातून नवं काहीतरी उभं राहील याची शाश्वती वाटत नाही.

**कवतिकी माझी माय तिला दांडाचं लुगडं**
**उन्हापावसात न्हाली उभ्या आयुष्याची झड**

(८।८।८।८ - पृ. ५३)

कृषिव्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे कवी देशमुखांना समग्र आकलन आहे. म्हणूनच कवतिकी मायचा अंदाज ते अचूक शब्दात टिपतात. ही ग्रामीण कवितेतील आशयाची बदलती अंगे अशा रूपाने प्रतीत झाली आहेत.

त्याच कवितेत 'पाऊस' बापासाठी परमेश्वर असतो. म्हणूनच पावसाचे आगमन झाल्यावर म्हातारा बाप दोन्ही हाताने टाळ्या वाजवितो. कारण पाऊस म्हाताऱ्या बापाचं रीण फेडणारा, पाऊस उभ्या जगाची भूक भागविणारा, बापाच्या गाय म्हशींना, चिमण्या पाखरांना, कोंबड्या कुत्र्यांना चारा देणारा असतो.

**फिटवं रे बापा आता उभ्या जगण्याचं रीण**
**वाजवते टाळी टाळी पिकलेले झाडपान**

(८।८।८।८ - पृ.५३)

कवी श्रीकांत देशमुखांच्या कवितेत पावसाच्या आगमनाची जीव लावून वाट पाहणारा जसा बाप येतो. तसाच पावसाचे आगमन झाल्यावर आनंदाने टाळी वाजविणारा बापही येतो. कवी देशमुखांच्या कवितेतील अभंग एकाच वेळी दुहेरी आशय व्यक्त करतो. ग्रामीण कवितेतील आशयाच्या बाबतीत असलेली ही विविधता १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेचे वेगळेपण, निराळेपण सिद्ध करते. कवी देशमुख कृषिव्यवस्थेला साकार करताना लहान अभंगाचे अनुकरण करतात.

भगवान ठग व श्रीकांत देशमुख यांनी समग्र कृषिव्यवस्थेचा आविष्कार करताना संतसाहित्यातील मोठ्या व छोट्या अभंगाचे अनुकरण केले आहे.

**एकटा वाजवा**
**रात्रंदिन फिरे**
**वावरात करे**
**देहत्याग** (६।६।६।४ - मोठा अभंग - कवी ठग, पृ.५८)

**फिटवं रे बापा आता उभ्या जगण्याचं रीण**
**वाजवते टाळी टाळी पिकलेले झाडपान**

(८।८।८।८ - लहानअभंग - कवी देशमुख, पृ.५३)

## ५.३ सामाजिक जीवन :-

आज एकविसाव्या शतकात बदलत्या परिस्थितीनुसार समाजाच्या गरजा आणि गरजांचे स्वरूप बदलत चालले आहे. भावनाप्रधान असलेल्या माणसाने आपल्या इच्छापूर्तीसाठी निसर्गाचा संहार केला. त्यामुळे निसर्ग आज बोचरा झाला. त्याचा वातावरणांवर, ऋतुमानांवर आणि पर्यायाने मानवी जीवनावर वाईट परिणाम झाला. आज वर्षानुवर्षे पडत असलेले दुष्काळ, पृथ्वीवर वाढत चाललेले तापमान हे निगर्ससंहाराचेच परिणाम आहेत. निसर्गसंहारामुळे समाजजीवनावर झालेला परिणाम कवी भगवान ठग यांनी आपल्या अभंगरूपी कवितेतून प्रकट केला आहे.

कवी भगवान ठगांच्या 'विद्रुप नीती' ह्या कवितेमध्ये मानवाने पृथ्वीची नासधूस केल्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला. त्याचा परिणाम शेती, पाणी, जीवन आणि अर्थव्यवस्था या घटकांवर झाला. ज्या मानवाने पृथ्वीच्या चिंध्या केल्या, पृथ्वीला अनंत वेदना दिल्या. तोच माणूस आज माणसांचा संहार करायला घाबरत नाही. मानवाच्या मनोविकृतीमुळे आज जागोजागी रक्ताचे सडे पडलेले दिसून येतात.

**वेदनांच्या खुणा**
**पृथ्वीची वाभाडे**
**रक्ताचे हे सडे**
**जागोजागी** (६।६।६।४ - पृ. १८)

मानवाच्या विनाशाला माणूसच जबाबदार आहे. त्याची वृत्ती-प्रवृत्ती कारणीभूत आहे. असे कवी ठग आपल्या कवितेतून प्रकट करतात. कवी ठगांनी अभंगातून समाजजीवनावर टाकलेला दृष्टिक्षेप प्रभावी ठरताना दिसतो.

कवी ठगांच्या 'रक्तफुले' ह्या कवितेत क्षणिक सुखाच्या पाठीमागे लागलेला माणूस आपल्या इच्छेआड येणाऱ्या गोष्टींचा क्षणांत संहार करून टाकतो. आज निसर्गाचा होत असलेला संहार त्याच्या क्षणिक इच्छेपोटीच झाला आहे. त्यामुळे आज पहिल्यासारखा पाऊस पडत नाही. रानामाळातून पावसाच्या पाण्याचे ओहळ वाहताना दिसत नाहीत, याला केवळ माणूस आणि माणसांची वासनाच कारणीभूत आहे आणि आज तर माणसांच्या वासनेला महापूरच आला आहे असे भगवान ठग म्हणतात.

**दृष्टीला चकवा**
**असाच लागला**
**वासनेला आला**
**महापूर** (६।६।६।४ - पृ. २२)

कवी ठगांनी आजच्या पर्यावरणाचा समाजजीवनावर होत असलेला प्रतिकूल परिणाम आपल्या अभंगरूपी कवितेतून प्रकट केला आहे.

## ५.४ सांस्कृतिक जीवन :-

'संतसाहित्य', 'लोकसाहित्य', भारतीय संस्कृतीतील सण, उत्सव, विविध चालीरिती इ. घटक हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाची अंगे आहेत. कवी ठग व कवी देशमुख यांनी आपल्या अभंगरूपी कवितेतून महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जोपासण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रामीण जीवनाच्या मनाशी एकरूप असणारे संतसाहित्य कवी देशमुखांनी आपल्या कवितेतून उभे केले आहे. 'गोदावरी काठ' ह्या कवितेतून कवी देशमुख बळिराजाच्या श्रद्धा, निष्ठा शोधतात. प्रस्तुत कवितेतून बळिराजा कितीही कंगाल झाला, रिता झाला तरी तो आपल्या जिवाभावाच्या पंढरीरायाला विसरत नाही. त्याची ही अपारनिष्ठा देशमुख अचूक टिपतात.

**पंढरीचा विठा**
**पायरीची वाट**
**रिते काठोकाठ वाळवंट** (६।६।६।४ - पृ. ६४)

कवी देशमुख कवितेतून बळिराजाचे जीवन मांडतात. शिवाय महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचिताला जपतात.

'झालो तुकाराम' ही देशमुखांची कविता वारकरी संप्रदाय आणि कृषिव्यवस्था यांच्यातील परस्परसंबंध उलगडून दाखविते. शिवारात अभंग कष्टाचा टाळ वाजविणारा बळिराजा शिवारापासून तुटतो. तेव्हा 'आपुले मरण पाहिले म्या डोळा । जाला अनुपम सोहळा' असे म्हणणाऱ्या तुकारामाचे तो उत्तरदायित्व स्वीकारतो.

**अभंग कोळून**
**झालो तुकाराम**
**माळावर टाळ तुटलेला** (६।६।६।४ - पृ. ८३)

संतसाहित्याचा अनमोल ठेवा जपणारी कृषिव्यवस्था अन् त्या कृषिव्यवस्थेला उभी करणारी देशमुखांची कविता म्हणूनच वेगळी ठरते. प्रस्तुत पद्यपंक्तीतील 'अभंग', 'तुकाराम', 'टाळ' ह्या दृश्य प्रतिमा संतसाहित्यातील आहेत. या प्रतिमा जरी संतसाहित्यातील असल्या तरी त्यातून व्यक्त झालेला आशय

मात्र पारंपरिक नाही तर आधुनिक ग्रामजीवनातील बळिराजाचे जीवन प्रतीत करणारा आहे. हेच देशमुखांच्या कवितेचे आणि ग्रामीण कवितेतील बदलत्या आशयाचे निराळेपण आहे.

कवी देशमुख संतसाहित्याला आपल्या अभंगरूपी कवितेतून अविष्कृत करताना ते कधी मोठ्या अभंगाचा तर कधी लहान अभंगाचे उपयोजन करतात.

**अभंग कोळून**
**झालो तुकाराम**
**माळावर टाळ तुटलेला**

(६।६।६।४ - पृ. ८३ - मोठा अभंग)

**आम्ही पिकवितो माल दहीभाताचे रांजण**
**पाण्यावर वाहिलेले मुक्या डोळ्याचे भजन**

(८।८।८।८ - पृ. ८५ - लहान अभंग)

कवी भगवान ठगांनीही आपल्या कवितेतून 'संतसाहित्य' व 'लोकसाहित्या'ला अविष्कृत करून आठशे वर्षानंतरही अभंगाची गोडी अवीट आहे याची प्रचिती दिली आहे. बळिराजाचे जीवन जसे काळ्या मातीशी बांधलेले आहे तसेच त्याने आपल्या जीवनात काळ्यासावळ्या विठ्ठलालाही महत्त्वाचे स्थान दिले आहे.

**विठ्ठल रूपाची**
**माझी काळी माती**
**आहे तिच्या हाती**
**शेतकरी** (६।६।६।४ - पृ. ११)

कवी भगवान ठग 'कोंब' ह्या कवितेतून शेतकऱ्याचे आणि पंढपूर च्या विठोबाचे हजारो वर्षापासूनचे असलेले अतुट नाते आपल्याही कवितेत कायम ठेवतात.

**असे कसे झाले ?**
**पोरके आभाळ**
**हातामध्ये टाळ**
**विठोबाच्या** (६।६।६।४ - पृ. ३१)

कवी ठगांना प्राचीन परंपराविषयी आदर आहे. शिवाय त्या जतन करणे ही आपली जबाबदारी आहे असे ते मानतात. कवी भगवान ठग व श्रीकांत देशमुख यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला बदलत्या आशय, विषय आणि शैलीतून अविष्कृत केले आहे.

## ५.५ शेतकऱ्यांच्या दु:स्थितीला जबाबदार घटक :-

मराठी ग्रामीण कवितेत अनेक कवींनी शेतकऱ्यांविषयी अन् त्याच्या शेतीविषयी लेखन केले आहे. पण शेतकऱ्याच्या होणाऱ्या दु:स्थितीला कोण जबाबदार आहे ? यावर कुणीही प्रकाश टाकलेला दिसत नाही. मात्र १९८० नंतरच्या तिसऱ्या पिढीतील कवी श्रीकांत देशमुख व कवी भगवान ठग यांनी शेतकऱ्यांच्या दु:स्थितीला जबाबदार ठरणाऱ्या घटकांवर प्रकाशझोत टाकला आहे.

बळिराजाच्या दु:स्थितीला निसर्ग, सावकार, व्यापारी, व्यवस्था (शासन व्यवस्था) व प्रारब्ध हे घटक जबाबदार असल्याचे कवी भगवान ठग यांनी आपल्या कवितेतून स्पष्ट केले आहे.

कवी ठगांच्या 'ओशाळते माती'ह्या कवितेमध्ये संधीसाधू राजकारणी, स्वार्थी व्यापारी, धूर्त पुढारी, शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांची लूट करतात आणि शेवटी त्यांच्याच जीवावर उठतात. या राज्यातील व्यवस्था बळिराजाच्या मालाला योग्य हमीभाव ठरवून देत नाही. परिणामी बळिराजाच्या विकासाचे पंख छाटले जातात. या देशातील व्यवस्था आणि व्यापारी वर्गच बळिराजाच्या प्रगतीतील मोठा अडसर आहे.

**प्रश्न पर्वामध्ये**
**पंख छाटतात**
**आणि उठतात**
**जीवावर** (६।६।६।४ - पृ. १२)

बळिराजाचेजीवन प्रश्नांनी वलयांकित आहे म्हणून कवी प्रश्नपर्व असा शब्दप्रयोग करतो.

कवी ठगांच्या 'आज्ञा' ह्या कवितेमध्ये आज सरकारी व्यवस्था बळिराजांसाठी जे जे निर्णय घेते, योजना आखते त्या सगळ्या खोट्या ठरतात. त्यांनी मांडलेले आतापर्यंतचे सगळे सिद्धांत, सगळी आश्वासने कागदावरच राहतात. म्हणूनच शासन हे विश्वासघातकी आहे असा बळिराजाचा समज होतो.

**सारे तपशील**

**वेंधळे वेंधळे**

**सिद्धांत सगळे**

**दगाबाज** (६।६।६।४ - पृ. २४)

'आयुष्याचा' ह्या कवितेमध्ये बळिराजाचे दु:ख तो ज्या मातीत राबतो, त्या मातीत उगवत नाही. तर बळिराजाच्या दु:खाचे मूळ कारण त्याचे प्रारब्ध होय. बळिराजाचे प्रारब्ध फुटके निघाल्यामुळे त्याच्या आयुष्याची माती होते. दैवाचे भोग भोगता भोगता पाय भेगाळतात, जीव कुडीत उरतो. आयुष्याचा शेवट जवळ आला तरीही नशीब फळफळत नाही कारण त्याच्या प्रारब्धाची केव्हाच माती झाली आहे.

**प्रारब्धाची माती**

**पाय भेगाळले**

**टिंबात उरले**

**आयुष्य** (६।६।६।३ - पृ. २८)

'मीच कास्तकार' ह्या कवितेमध्ये बळिराजा परिस्थितीपुढे पराभूत होतो. तेव्हा त्याच्यापुढे एकच पर्याय उरतो, तो म्हणजे आत्महत्या. बळिराजाची जीवनात जी अधोगती झाली आहे त्याला निसर्ग, सावकार, व्यवस्था, प्रारब्ध जबाबदार आहे याची त्याला खात्री आहे. म्हणूनच तो न संपणाऱ्या दु:खातून मुक्त होण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो आणि आपल्या दु:खाला त्याच्या परीने तो संपवितो.

**काय करू आता**

**करू आत्महत्या**

**अरे हे निर्मात्या**

**तुझ्यापायी** (६।६।६।४ - पृ. ५६)

कवी भगवान ठग यांनी बळिराजाच्या जीवनात अडसर ठरणाऱ्या आणि बळिराजाच्या दु:स्थितीला जबाबदार ठरणाऱ्या घटकांवर प्रकाश टाकत ग्रामीण कवितेतील आशयाला वेगळे वळण दिले आहे.

कवी देशमुख यांनी 'पाणी झाले काठोकाठ' ह्या कवितेत शिवारात राबणाऱ्या बळिराजाला निसर्ग कधीच साथ देत नाही. न पिकणाऱ्या शेतीमुळे जगाचा पोशिंदा हैराण होतो. पुरता वाकून जातो. दाहीदिशा त्याच्यासाठी जेव्हा अंधार ठरतात. तेव्हा तो नुसता रडत नाही तर तो मरण जगत, अनुभवत असतो.

**कळसात ओला राघू　　चोच पंखात टाकतो**

**तुकोबाच्या अभंगात　　देव एकटा रडतो**　　(८।८।८।८ - पृ. २९)

कवी देशमुखांनी निसर्ग कोपल्यामुळे बळिराजाच्या आयुष्याची झालेली दयनीय अवस्था लहान अभंगातून प्रभावीपणे चित्रीत केली आहे.

कवी देशमुखांच्या 'कासोटा' ह्या कवितेत बळिराजाच्या संयमाचा बांध फुटल्यानंतर त्याची प्रतिक्रिया किती विद्धवंसक स्वरूपाची आहे याचे प्रचिती येते. भरलेल्या आभाळातून पाऊस ढासळत नाही तेव्हा बळिराजा पावसावर हासूड ओढायला घाबरत नाही.

**शिवेवर हाती**

**हासूडच घ्यावा**

**बेदम ठोकावा　　　पावसाला**　　(६।६।६।४ - पृ.७७)

कवी देशमुखांनी कधी मोठ्या अभंगातून तर कधी छोट्या अभंगातून बळिराजाच्या अधोगतीला कारणीभूत ठरणाऱ्या निसर्गाला प्रतीत केले आहे.

कवी श्रीकांत देशमुख व कवी भगवान ठग यांनी शेतकरी जीवन, कृषिव्यवस्था, सामाजिक जीवन, सांस्कृतिक जीवन यांच्या अनुरोधाने ग्रामीण कवितेला अभंगाच्या माध्यमातून वेगळा आशय प्राप्त करून दिला आहे. म्हणूनच ग्रामीण कवितेच्या आशयात त्यांनी घडवून आणलेल्या बदलांची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते.

## ६.　ग्रामीण कविता : अभंगातील लवचिकता :-

महाराष्ट्रीय संतांनी 'अभंग' हा छंद खऱ्या अर्थाने लोकप्रिय आणि चिरंजीव करून ठेवला. त्याचे श्रेय विशेषत: ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांना द्यावे लागेल. 'अभंग' हा छंद अत्यंत लवचिक आहे. या त्याच्या अंगभूत गुणांमुळे मराठी कवितेला अभंगाचा घाट मिळाला, रूप मिळाले. अंत:करणातील खऱ्याखुऱ्या भावनेला अविष्कृत करण्यासाठी 'अभंग' हा आकृतिबंध अतिशय जवळचा आणि अनुरूप आहे. आत्यंतिक तळमळ, अकृत्रिमता व भावनेची उर्मी प्रकट करण्यासाठी अनुरूप असलेल्या अभंगाची दखल विसाव्या शतकातील कवींनी जेवढी घ्यावयास हवी होती तेवढी घेतलेली दिसून येत नाही. मात्र १९८० नंतरच्या विशेषत: तिसऱ्या पिढीतील इंद्रजित भालेराव, राजन गवस, विठ्ठल वाघ, सोपान हाळमकर, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख, भगवान ठग इ. कवींनी 'अभंग' आकृतिबंधाचा फार प्रभावीपणे वापर केला आहे.

कवी भगवान ठग यांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून तर कवी श्रीकांत देशमुख यांनी 'बळिवंत' मधून अभंगाच्या अंगी असलेल्या 'लवचिकता' ह्या गुणाचा कोणत्याही कालखंडात आपणाला सहज वापर करता येतो हे दाखवून दिले आहे. ग्रामीण कवितेतील 'अभंग' आकृतिबंधात असलेली लवचिकता खालील मुद्यांच्या आधारे पाहूया.

## ६.१ शब्द योजनेतील लवचिकता :-

कवी श्रीकांत देशमुख व भगवान ठग यांनी अभंग आकृतिबंध स्वीकारताना त्यातील लवचिकता हेरून आपल्या कवितेतील शब्दयोजनेत बदल केला आहे. शब्दयोजनेत बदल केल्यामुळे आशय, विषयावर कोणताही परिणाम होत नाही हेही त्यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे. शब्दांतील निवड योजना ही त्या त्या कवींचा वेगळा प्रभाव दर्शविणारी आहे.

कवी भगवान ठग यांनी आपल्या कवितेतील शब्दयोजनेत बदल करताना त्यांनी पारंपरिक अभंगाला थोडासा फाटा दिला आहे. पारंपरिक मोठ्या अभंगात सुरवातीच्या तीन चरणांत सहा अक्षरे व शेवटच्या चरणांत चार अक्षरे आहेत. पारंपरिक मोठ्या अभंगात शेवटच्या चरणातील चार अक्षरे दोन शब्दातून व्यक्त झालेली आहेत. कवी भगवान ठगांच्या प्रत्येक अभंगात फक्त शेवटच्या चरणांत बदल जाणवतो. हा बदल अक्षर योजनेत नसून शब्दयोजनेत आहे. भगवान ठगांच्या कवितेतील शेवटच्या चरणांत चार अक्षरे आहेत. पण ती एकाच शब्दातून व्यक्त झालेली आहेत. पारंपरिक मोठ्या अभंगात आणि कवी ठगांच्या मोठ्या अभंगात एवढाच काय तो बदल जाणवतो.

**''लक्ष्मण भावोजी । मागे पुढे स्वामी। मज आहे धामी । ऐसे वाटी''**[७]

(६।६।६।४) (रामदास)

(वाळंबे मो. रा. - सुगम मराठी व्याकरण व लेखन, पृ. १६६)

**काय करू आता**

**करू आत्महत्या**

**अरे हे निर्मात्या**

**तुझ्यापायी** (६।६।६।४ - पृ. ५६)

कवी ठगांच्या असंख्य कवितेतून शेवटच्या चरणांतील चार अक्षरे एकाच शब्दांतून प्रकट होतात.

कवी ठगांच्या अभंगातील शब्दयोजनेत जो बदल आहे, तोच बदल कवी श्रीकांत देशमुखांच्याही मोठ्या अभंगात जाणवतो. कवी देशमुखांच्या बहुतांश कवितेतून शेवटच्या चरणातील चार अक्षरे एकाच शब्दातून व्यक्त झाली आहेत.

**आम्हा घरी तण**

**अंधाराचे धन**

**डोळ्यातले पान सुकलेले** (६।६।६।४ - पृ. ५७)

कवी ठगांच्या व कवी देशमुखांच्या अभंगातील शब्दयोजनेत झालेला बदल कवितेतील आशयावर कोणताही प्रतिकूल परिणाम करत नाही. त्यामुळेच अभंगाच्या अंगी असलेली ही लवचिकता कोणत्याही काळात अर्थपूर्ण आणि यशस्वी ठरते.

## ६.२ चरण योजनेतील लवचिकता :-

महाराष्ट्रीय संतांच्या अभंगातील चरण योजना बघितली तर असे दिसून येते की, संतांनी आपल्या अभंगाची चरणयोजना एकसमोर एक अशी केली आहे. शिवाय प्रत्येक चरणांसमोर उभी रेघ किंवा उभे चरण आहे.

**जाणावा तो ज्ञानी । पूर्ण समाधानी । निःसंदेह मनी । सर्वकाळ ।।**''[८]

(६।६।६।४) (पृ. १६६)

कवी भगवान ठगांनी मात्र पारंपरिक चरणयोजनेला छेद देत आपल्या अभंगातील चरणयोजना एकासमोर एक अशी न करता एकाखाली एक असे तीन चरण मांडून तिसऱ्या चरणाच्या समोरच चौथा चरण योजला आहे. कवी देशमुखांनीही चरण संपल्यानंतर कुठलीही सांकेतिकता दर्शविली नाही.

**रानाचिया वाटे**

**येऊ दे मरण**

**जिवाचे तारण ठेवोनिया** (६।६।६।४ - पृ. ७५)

कवी देशमुखांच्या अशा चरण योजनेमुळे त्यांचा अभंग लक्ष वेधून घेतो. अभंगाच्या अंगी असलेली लवचिकता शब्दयोजनेप्रमाणे चरणयोजनेतही दिसून येते. चरणयोजनेत बदल केल्यामुळे अभंगातील लय, ताल, नाद, ठेका यावर कुठलाही परिणाम झालेला दिसून येत नाही. अभंगाच्या अंगी असलेली लवचिकता कुठलीही संदिग्धता निर्माण करत नाही. त्यामुळे तेराव्या शतकात जन्मलेला अभंग एकविसाव्या शतकातही आपल्या लवचिकतेमुळे चिरंजीव, चिरतरुण दिसतो.

## ६.३ स्थलकाळाच्या दृष्टीने आलेली लवचिकता :-

तेराव्या शतकांमध्ये तळागाळातील समाज अज्ञानाच्या गुलामगिरीत पिचत होता. अशावेळी अठरापगड जातीतील संत एकत्रित आले आणि त्यांनी भागवत धर्माची स्थापना केली. संतांनी अभंग, पदे, गौळणी, भारूडे यांच्या माध्यमातून समाजातील विषमता नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्याचे श्रेय ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखोबा, सेना न्हावी, सावता माळी यांना द्यावे लागेल. अभंगाच्या माध्यमातून संतांनी संपूर्ण महाराष्ट्राला सन्मार्गाची आणि सदाचरणाची शिकवण दिली. अभंगाच्या निर्मिती पाठीमागे संतांचा हेतू हा होता की, समाजात मूल्यव्यवस्था प्रस्थापित होऊन समाजजागृती व्हावी. त्यांचा हा उद्देश त्यांनी अभंगाच्या माध्यमातून सफल करून दाखविला आहे.

**कोण तो सोवळा । कोण तो ओवळा । दोघांच्या वेगळा । विठू माझा ।।** (चोखोबा)

सर्वसामान्याच्या उद्धारासाठी तेराव्याशतकात निर्माण झालेला अभंग आज एकविसाव्या शतकातही ग्रामीण जीवन, कृषिजीवन मांडण्यासाठी उपयुक्त ठरतो. म्हणजेच अभंगाच्या अंगी असलेल्या लवचिकतेला स्थळकाळाच्या कुठल्याही मर्यादा, सीमा निर्माण होत नाहीत. कोणत्याही कालखंडात कोणताही विषय अभंगाच्या माध्यमातून सहज, सोप्या व प्रभावी शब्दांत मांडता येतो. हे कवी भगवान ठग यांनी 'अन्नदात्याची धुळाक्षरे' मधून व श्रीकांत देशमुख यांनी 'बळिवंत' मधून सिद्ध करून दाखविले आहे.

कवी श्रीकांत देशमुखांनी 'विहीर' या कवितेतून कृषिव्यवस्थेतील स्त्रीचे रानशिवारावर असलेले प्रेम व्यक्त केले आहे.

**रानाचिया वाटे**

**येऊ दे मरण**

**जिवाचे तारण ठेवोनिया** (६।६।६।४ - पृ.७४)

शिवारालाच आपलं आयुष्य समर्पित करणारी ही कृषिव्यवस्थेतील स्त्री शिवारालाच जिवाचे तोरण बांधण्यात आपली सार्थकता मानते. ग्रामीण जीवनातील कोणताही विषय देशमुख अभंगाच्या माध्यमातून सफाईदारपणे हाताळतात.

कवी ठग तर अभंगाच्या माध्यमातून समग्र समाजाचा शोध घेतात. त्यांनी आपल्या 'वाट नागमोडी' ह्या कवितेतून समाजातील मध्यमवर्ग आणि शेतकरी यांच्यातील भेद स्पष्ट केला आहे.

बळिराजाच्या अवतीभोवती सुखाचे चांदणे पसरले आहे. या सुखाच्या चांदण्यात राजकीय पुढारी, नेते, व्यापारी, सावकार, मध्यमवर्गीय लोक न्हाऊन निघत आहेत. फक्त बळिराजा या सुखापासून वंचित आहे. ज्या बळिराजाच्या, कष्टकऱ्याच्या जीवावर हे मध्यमवर्गीय लोक सुख उपभोगतात त्या बळिवंताची झोपडी आज रडते आहे. त्याकडे कुणाचेही लक्ष नाही. त्यामुळे बळिराजाची झोपडीच आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. असे ठग कवितेतून सूचित करतात आणि वाचकांचे लक्ष वेधून घेतात.

**चांदण्यात माझी**
**रडते झोपडी**
**वाट नागमोडी**
**चेंगरली** (६।६।६।४ - पृ. ५७)

अभंगाच्या अंगी असलेली लवचिकता आपल्याला कवी ठग आणि कवी देशमुख यांच्या कवितेतून ठायी ठायी प्रकट होताना दिसते.

## ६.४ आशयातील वैविध्यता :-

अभंगामध्ये असलेली लवचिकता १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील आशययोजनेत दिसून येते. ग्रामीण कवितेत आलेला अभंग हा पारंपरिक कथ्य स्वरूपाचा नाही तर ग्रामीण जीवनानुभव प्रतीत करणारा आहे. अभंगाच्या अंगी असलेली लवचिकता अर्थपूर्ण आणि परिवर्तनशील ठरणारी आहे. तेराव्या शतकातील संतकवींनी अभंगाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातीभेद, विषमता, समता, अध्यात्मिकता, परमार्थ, विठ्ठलमहात्म्य, गुरूमहात्म्य, संतमहात्म्य, सगुण-निर्गुण भक्ती असे अनेकविध विषय हाताळले आहेत.

१९८० नंतरच्या ग्रामीण कवितेत आलेल्या अभंगाने पारंपरिक कथ्य कथन केले नाही तर शेती, शेतकरी, गाव, कुटुंब, सुख, दुःख, दारिद्र्य, तुटलेपण, अडवणूक, फसवणूक, प्राणी, पशू, पक्षी, निसर्ग, दुष्काळ, पाऊसपाणी असे अनेक विषय खूप प्रभावी आणि परिणामकारकपणे हाताळले आहेत.

अभंगाच्या अंगी असलेल्या 'लवचिकता' या गुणामुळेच ग्रामीण कवितेतील आशयात आपल्याला वैविध्यपूर्णता आणि वेगळेपणा दिसून येतो.

कवी भगवान ठग व श्रीकांत देशमुख यांनी आपल्या कवितेतून अभंगाच्या अंगी असलेली 'लवचिकता' या गुणांचा ग्रामीण जीवनाच्या प्रकटीकरणासाठी उपयोग करून अभंगाला ग्रामीण कवितेत मौलिक स्थान प्राप्त करून दिले आहे.

संतसाहित्यातील अभंगरचना प्रामुख्याने अध्यात्म व धर्मकेंद्रित स्तरावरील दिसते. परंतु त्याच आकृतिबंधाचा प्रसंगी लवचिकता स्वीकारून ग्रामीण कवींनी ग्राम वास्तवाचे उत्कट दर्शन घडविण्यासाठी केला आहे.

## ७. **निष्कर्ष :-**

७.१ अभंगातील आशय काळानुरूप बदललेला दिसून येतो.

७.२ अभंगाच्या अंगी असलेल्या 'लवचिकता'ह्या गुणाचा कोणत्याही कालखंडात सहज वापर करता येतो.

७.३ १९८० नंतरच्या पूर्वीचा अभंग ग्रामीण जीवनाच्या उद्धारासाठी निर्माण झाला होता आणि १९८० नंतर ग्रामीण कवितेत आलेला अभंगही ग्रामीण जीवन मांडण्यासाठीच निर्माण झाला आहे.

७.४ ग्रामीण कवितेतील आशयात अभंगामुळे वैविध्यपूर्णता दिसून येते.

७.५ पारंपरिक अभंग आणि ग्रामीण कवितेतील अभंग यांच्यातील चरणसंख्येत, अक्षरसंख्येत साधर्म्य दिसून येते.

७.६ ग्रामीण कवितेतील अभंग आशयाने समृद्ध, विषयाने अर्थपूर्ण आणि शैलीने भारदस्त आहे.

७.७ १९८० नंतरच्या कवितेत आलेला अभंग ग्रामीण कवितेचे वेगळेपण दर्शवितो आणि ग्रामीण कवितेची बदलती दिशा स्पष्ट करतो.

## संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुलकर्णी मधु | - | 'ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण' (शुभदा सारस्वत, पब्लि. पुणे, प्रथमावृत्ती - १९८७, पृ. ०५) |
| २. | कुलकर्णी मधु | - | तत्रैव ( पृ. ०६) |
| ३. | कुलकर्णी श्री. रं. | - | 'ओवी ते लावणी' (का. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था देवपूर, धुळे, प्रथमावृत्ती १९९४, पृ.६६) |
| ४. | कुलकर्णी श्री. रं. | - | तत्रैव ( पृ. ६६) |
| ५. | कुलकर्णी श्री. रं. | - | तत्रैव ( पृ. ८३) |
| ६. | वाळंबे (कै) मो. रा. | - | 'सुगम मराठी व्याकरण लेखन' (नितीन प्रकाशन, पुणे ४११ ०३०, आवृत्ती जाने. २००५, पृ.१६६) |
| ७. | वाळंबे (कै) मो. रा. | - | तत्रैव (पृ. १६६) |
| ८. | वाळंबे (कै) मो. रा. | - | तत्रैव ( पृ. १६६) |


------x------